# अधिसूचना

महसूल व वन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २१ मार्च,२०००.

## भारताचे संविधान

क्रमांक : सेवा १०९९/प्र.क्र. २३/ई-९ :- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागातील अव्वल कारकून / मंडळ अधिकारी ही पदे धारण केलेल्या व्यक्तींना नायब तहसीलदाराच्या पदावर पदोन्नती देण्याच्या प्रयोजनार्थ, या व्यक्तींची निवडसूची तयार करणे, परिरक्षा करणे व त्यात सुधारणा करणे यासाठी पुढील नियम करीत आहेत, ते असे :-

१. **संक्षिप्त नांव** :-(अ) या नियमांना, महसूल व वन विभागातील नायब तहसिलदाराच्या पदावरील पदोन्नतीसाठी निवडसूची (तयार करणे, परिरक्षा करणे व त्यात सुधारणा करणे) नियम, २००० असे म्हणावे.

(ब) हे नियम राजपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. "**व्याख्या**" :- संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत, -

(अ) "**नियुक्ती प्राधिकारी**" म्हणजे महसूल व वन विभाग,

(ब) "**अव्वल कारकून**" या संज्ञेत कोषागार अव्वल कारकून, उप चिटणीस, जिल्हाधिका-यांचा द्वितीय लिपिक, शिरस्तेदार, प्रथमश्रेणी लिपिक व वरिष्ठ लिपिक यांचा समावेश होतो,

(क) "**मंडळ अधिकारी**" म्हणजे मंडळ अधिका-यांचे पद धारण करणारी व्यक्ती,

(ड) "**आयोग**" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ई) **"आयुक्त"** म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ६ अन्वये नेमलेला विभागीय आयुक्त,

(फ) **"समिती"** म्हणजे नियम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली निवड समिती

(ग) **" शासन"** म्हणजे महाराष्ट्र शासन,

(ह) **"नायब तहसीलदार"** म्हणजे आयोगाने घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षांच्या निकालानुसार नामनिर्देशन करुन किंवा ज्यांनी महसूल विषयक दुय्यम सेवेमध्ये अव्वल कारकून / मंडळ अधिकारी म्हणून किमान तीन वर्षे अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा जिल्हा संवर्गातील अव्वल कारकून/मंडळ अधिकारी यामधून योग्य त्या व्यक्तीला पदोन्नती देऊन, महाराष्ट्र नागरी सेवा, गट-ब मधील नायब तहसीलदाराच्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती,

(आय) **"अनुसूची"** म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची,

(जे) **"निवडसूची"** म्हणजे ज्या व्यक्ती महसूल विभागातील नायब तहसीलदार, गट-"ब" या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र आहेत आणि ज्यांना या नियमांनुसार पदोन्नतीसाठी योग्य व पात्र समजण्यात आले आहे अशा महसूल व वन विभागातील अव्वल कारकून/मंडळ अधिकारी ही पदे धारण करणा-या व्यक्तींच्या नांवांची सूची.

३. “ **निवड समितीची स्थापना**” :- विविध जिल्हयांमधील महसूल विभागामध्ये अव्वल कारकून /मंडळ अधिकारी हे पद धारण करणा-या, महसूल विभागातील गट-ब मधील नायब तहसीलदारांच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी योग्य असलेल्या व्यक्तींची निवडसूची तयार करण्यासाठी, राज्य शासन, सर्व विभागांचे विभागीय आयुक्त, सर्व विभागांचे उपायुक्त (महसूल) आणि जिल्हयांचे जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचा समावेश असलेली समिती स्थापन करील. विभागीय आयुक्त हा समितीचा अध्यक्ष असेल, उपायुक्त (महसूल) हा सदस्य सचिव असेल आणि जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी हा सदस्य असेल.

४. **"समितीची सभा"**:- निवड सूची तयार करण्यासाठी सामान्यपणे प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्यात किंवा राज्य शासन त्याबाबतीत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर महिन्यात समितीची सभा भरविण्यात येईल.

५. **"दरवर्षी निवडसूची तयार करणे इत्यादी"**:- (एक) अव्वल कारकून आणि मंडळ अधिकारी ही पदे धारण केलेल्या, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या सर्व व्यक्तींच्या मागण्या समिती दर वर्षी विचारात घेईल व पदोन्नतीद्वारे भरण्यासाठी उपलब्ध होणा-या रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी तिने योग्य ठरविलेल्या व्यक्तींची निवडसूची तयार करील.

(दोन) ही निवडसूची सर्वसाधारणपणे अगोदरच अस्तित्वात असलेल्या रिक्त पदांच्या आणि पुढील एका वर्षाच्या काळात निर्माण होण्याची शक्यता असलेल्या रिक्त पदांच्या संख्येपुरती मर्यादित असेल.

(तीन) निवडसूचीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी विचारात घेतलेल्या व्यक्तींची संख्या, पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेली रिक्त पदे २५ पेक्षा अधिक नसतील तर, त्या पदांच्या संख्येच्या तीन पट एवढी असेल आणि इतर प्रकरणांमध्ये , पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदांच्या संख्येच्या दोन पट एवढी असेल.

(चार) या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, समिती, प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्यामध्ये किंवा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्यानंतरच्या इतर दिनांकाच्या आत, आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये व शासकीय परिपत्रकांमध्ये अंतर्भूत असलेले आदेश लक्षात घेऊन निवडसूची तयार करील.

६. **निवडसूची तयार करण्याबाबतची पध्दत :-** समिती पुढे दिलेल्या पध्दतीनुसार निवडसूची तयार करील :-

(१) निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाची नांवे, सामान्यपणे संबंधित व्यक्तींचा केंव्हाही एकदाच निवडसूचीमध्ये अंतर्भाव करतेवेळी, संपूरक संवर्गातील / पदांतील

परस्पर ज्येष्ठता क्रमाने लावण्यात येतील आणि निवड सूची, निवडलेला उमेदवार सामान्यतः ज्या पदावर नियुक्त केला जाईल ते पद दर्शवील.

परंतु, समितीच्या मते जिच्याकडे लक्षणीय गुणवत्ता असेल अशा कोणत्याही व्यक्तींच्या बाबतीत समिती, केवळ ज्येष्ठताक्रमाच्या आधारे, निश्चित झालेल्या जागांपेक्षा अधिकतम सहा जागांपर्यन्त उच्चतर क्रमांक नेमून देईल.

(२) जेव्हा एखाद्या अधिका-याच्या गोपनीय अहवालाच्या आधारे, त्याचे नांव पदोन्नतीसाठी पूर्णपणे योग्य असल्याचे समजण्यात आले नसेल, परंतु, उत्तेजन मिळावे म्हणून निवडसूचीमध्ये दाखल करावयास पात्र असेल तेव्हा, ते संपूरक संवर्गातील त्यांच्या ज्येष्ठताक्रमाने निश्चित झालेल्या जागेकरिता, निवड सूचीमध्ये अंतर्भूत करण्यात येईल. त्याची निवडसूचीत नोंद करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि निवड सूचीवरील त्याच्या धारणाधिकाराचे निवडसूचीची पुढची सुधारित आवृत्ती काढतेवेळी पुर्नविलोकन करण्यात येईल. या अधिका-याची कोणत्याही काळातील कामगिरी समाधानकारक असल्याचे दिसून आले तर, मूळ निवडसूचीला, कोणत्याही लक्षितार्थाशिवाय , अंतिम रुप देण्यात येईल. जर, या अधिका-याची कोणत्याही काळातील कामगिरी समाधानकारक नसल्याचे आणि पुढील एक वर्षासाठी त्याच्यावर लक्ष ठेवावे असे समितीला वाटले तर, त्याचे नाव पहिल्या निवडसूचीतून वगळण्याचे परंतु दुस-या निवडसूचीत सर्वप्रथम नोंदविण्याचे आदेश देण्यात येतील. निवडसूचीची पुढची सुधारित आवृत्ती काढतेवेळी, दुस-या खेपेस निवडसूचीमध्ये नोंद करण्यात आलेल्या व्यक्तीची निवडसूचीमध्ये नोंद ठेवून घेण्यास ती योग्य नाही असे समितीला वाटले तर, ती व्यक्ती अपात्र आहे म्हणून निवडसूचीमधून तिचे नांव वगळण्यात यावे म्हणून समिती निदेश देईल.

(३) ज्यांची निवडसूंचीमध्ये तात्पुरती नोंद ठेवून घेण्यात आली आहे किंवा ज्यांची नावे निवडसूचीतून वगळण्यात आली आहेत किंवा निवडसूचीत अंतर्भाव करण्यासाठी ज्यांना निवडसूचीत अंतर्भावास अपात्र समजण्यात आले आहे किंवा ज्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचे दिसून आल्यामुळे पुढील एक वर्षासाठी त्यांच्यावर लक्ष ठेवण्यात आले आहे, अशा व्यक्तींची प्रकरणे, निवडसूचीची पुढील सुधारित आवृत्ती

काढतेवेळी विचारात घेण्यात येतील,

परंतु, एखाद्या व्यक्तीचे नांव निवडसूचीवर आणण्यात आले तर, ती व्यक्ती निवडसूचीमध्ये ज्यांच्या पहिल्या प्रथमच अंतर्भाव करण्यात आला असेल त्यांच्यामधून आपले पद घेईल.

७. **" निवडसूचीमध्ये ज्येष्ठताक्रम निश्चित करणे ":-** नियम ६ मध्ये उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, निवडसूचीतील व्यक्तींचा ज्येष्ठताक्रम, ज्या तारखेला त्यांची नावे निवडसूचीमध्ये नोंदविण्यात आली असतील त्या तारखेनुसार नियमित करण्यात येईल.

८. " **निवडसूची ची परिरक्षा करणे** ":- (१) जिचे नांव निवडसूचीत अंतर्भूत करण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, सर्वसाधारणपणे, ती नायब तहसीलदाराच्या पदावर कायम होत नाही किंवा शासकीय सेवेतून निवृत्त होत नाही किंवा अन्यथा सेवेत असल्याचे बंद होत नाही तोपर्यन्त निवडसूचीमध्ये त्याच पदावर राहील.

(२) आयोगाच्या मते, त्या व्यक्तीची निवडसूचीमध्ये नोंद असणे चालू ठेवण्यास ती अयोग्य असल्याचे नंतर दिसून आले तर, शासन आयोगाशी विचारविनिमय करुन, त्या व्यक्तींचे नांव निवडसूचीतून काढून टाकील. ती अगोदरच उच्च पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत असेल तर सूचीतून तिचे नांव काढून टाकण्यात आल्यामुळे ती व्यक्ती पदावनत होईल.

९. "**अंतिम निवडसूची**":-समितीकडून दरवर्षी तयार करण्यात येणारी निवडसूची राज्य शासनाला सादर करण्यात येईल. शासन ती सूची, ज्यांच्या प्रकरणांवर समितीने पुनर्विलोकन केले आहे आणि ज्यांची नांवे निवडसूचीत अंतर्भूत करावयाची आहेत किंवा त्यातून वगळावयाची आहेत अशा सर्व शासकीय कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालांचा अंतर्भाव असलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांसह, आयोगाच्या सल्ल्यासाठी पुढे पाठवील. त्यानंतर शासन आयोगाची मते विचारात घेऊन,अंतिम निवडसूची निश्चित करील.

१०. **पदोन्नती व स्थायीकरण** :- (१) नायब तहसीलदार हे पदोन्नतीचे पद तीन महिने किंवा त्याहून अधिक काळ रिक्त असेल तर, सामान्यपणे ज्याचे नांव निवडसूचीत पहिल्या क्रमांकावर आहे आणि जो आधीपासूनच स्थानापन्न म्हणून काम करीत आहे अशा व्यक्तीला पदोन्नती देऊन ते भरता येईल.

(२) निवडसूचीवर ज्यांची नांवे आहेत अशा अधिका-यांना, सर्वसाधारणपणे निवडसूचीमध्ये असलेल्या त्यांच्या स्थानानुसार नायब तहसीलदाराच्या पदावर कायम करण्यात येईल.

## अनुसूची

( नियम ५ (चार) पहा )

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०७२/जे,दिनांक २३/५/१९७४.

(२)शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही१०७४/डी,दिनांक२८/१/१९७५.

३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७५/३४२/१०, दिनांक.१/४/१९७६.

(४)शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७५/१०,दि.२/४/१९७६.

(५)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७७/३६५८/१२,दिनांक १९/९/७७.

६)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.इएक्सडी १०७६/१९४५/१३७/१७, दिनांक १/११/१९७७.

(७)शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७८/१२,दिनांक २०/९/१९७८.

(८)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०७८/८३१/१६-ब, दिनांक १४/४/१९८१.

(९)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७७/सीआर ३४३/७९/१२, दिनांक १८ मे,१९८३.

(१०)शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८१/१२५१/सीआर ६/८५/१२, दिनांक २३/७/१९८५.

(११) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८८/१०९/१२,दिनांक २५/८/१९८८.

(१२)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र. इएसबी-सीएफआर १०८५/८६८/१३, दिनांक ९/९/१९८८.

(१३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८९/४०६/प्र.क्र.५/८९/बारा दिनांक १/८/१९८९.

(१४)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८९/३६५४/(प्र.क्र.१२/८९) १२, दिनांक २८/३/१९९०.

(१५)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९१/२५५१/(क)/१६-ब,दिनांक २७/३/१९९१.

(१६)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४/८/१९९२.

(१७)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८८/(प्र.क्र.११/८८)/१२, दिनांक २१/२/१९९४.

(१८)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दिनांक ५/१२/१९९४.

(१९)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५/६/१९९५.

(२०)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.२६/७/१९९५.

(२१)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८/१०/१९९७.

(२२)शासन निर्णय,महसूल व वन विभाग,क्र.आरसीटी १०९५/प्र.क्र.२३०/ई-७, दिनांक १३/११/१९९८.

(२३) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही १०९५/प्र.क्र.८३७/ई७, दिनांक २०/११/१९९८.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( नंद लाल )

प्रधान सचिव,

महसूल व वन विभाग.

(सोबत, "महसूल व वन विभागातील नायब तहसीलदारांच्या पदावर पदोन्नतीसाठी निवडसूची (तयार करणे, परिरक्षा करणे व त्यात सुधारणा करणे) नियम, 2000 ची शासन अधिसूचना क्रमांक सेवा १०९९/प्र.क्र.२३/ई-९, दिनांक २१ मार्च,२००० ची मराठी व इंग्रजी प्रत.)

------

क्रमांकः सेवा १०९९/प्र.क्र.२३/ई-९

महसूल व वन वि भाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः २१ मार्च,२०००.

प्रति,

१) अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

* (पत्राने) *३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, फोर्ट, मुंबई.

४) सर्व विभागीय आयुक्त,

५) कार्यासन अधिकारी, ई, ई-१, ई-३, ई-७, ई-१० कार्यासन,महसूल वन विभाग,मंत्रालय,मुंबई.

६) सर्व जिल्हाधिकारी.

७) भाषा संचालक, महाराष्ट्र , नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे, (पूर्व), मुंबई.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
27 MAR 2000
आस्थापना
शाखा
लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

(ज.रे. बंकापुरे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.